सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. २३८ /२०२६

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, परिपत्रक क्र.९०/२०२६ नुसार विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागामध्ये शैक्षणिक वर्षाकरिता सहाय्यक प्राध्यापक (करार पध्दतीने) ही पदे भरली जातात. सदर शिक्षकांचे वेतन इतर नियमित सेवकांप्रमाणे करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे.

१. सहाय्यक प्राध्यापक (करार पध्दतीने) यांचा वेतनाकरिताचा कालावधी हा प्रत्येक महिन्याच्या दिनांक २६ पासून ते पुढील महिन्याच्या दिनांक २५ पर्यंत ग्राहय धरण्यात येईल.

२. माहे ऑक्टोबर, २०२६ चे वेतन दिवाळीनिमित्त ३१ दिवसांचे करण्यात येणार असून केवळ माहे नोव्हेंबर २०२६ चे वेतन २५ दिवसांचे करण्यात येईल. तदनंतर उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन अदा करण्यात येईल.

३. मा. विभागप्रमुख यांनी आपल्या विभागामध्ये कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे (करार पध्दतीने) हजेरी पत्रकानुसार २५ तारखेपर्यतच्या उपस्थितीची नोंद दिनांक २८ पर्यंत पूर्वीप्रमाणे HRMS प्रणालीमध्ये करावयाची आहे. उपस्थितीबाबतची नोंद केल्यानंतर मा.विभागप्रमुख यांच्या मोबाईलवर नोंदीबाबतचा ओटीपी क्रमांक प्राप्त होईल. सदर ओटीपी क्रमांकाची नोंद केल्यानंतर प्रत्येक संबंधित शिक्षकांची हजेरी पत्रकाबाबतची नोंदणी वेतनप्रणालीमध्ये जतन होणार आहे. त्यानुसार दिनांक २८ अखेरपर्यंत ऑनलाईन हजेरीपत्रकाची नोंदणी केलेल्या शिक्षकांचे वेतन नियमित सेवकांसोबत करण्यात येईल. दिनांक २८ नंतर हजेरीपत्रकाची नोंदणी केलेल्या शिक्षकाचे वेतन हे उर्वरित सर्व शिक्षकांची हजेरीपत्रकाची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर दिनांक १५ नंतर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करण्यात येईल. यानंतरही काही शिक्षकांच्या हजेरीपत्रकाची नोंदणी करावयाची राहिल्यास संबंधित शिक्षकांचे वेतन एकत्रितरित्या पुढील महिन्यात करण्यात येईल.

४. मा.विभागप्रमुख यांनी HRMS प्रणालीमध्ये एकदा हजेरीपत्रकाची नोंदणी अंतिम केल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास त्यासाठी प्रशासन शिक्षक कक्ष यांचेकडे दुरुस्तीसाठी संपर्क साधावा.

५. मा.विभागप्रमुख यांनी HRMS प्रणालीमध्ये एकदा हजेरीपत्रकाची नोंदणी अंतिम केल्यानंतर सदर नोंदी या थेट वित्त व लेखा विभागाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतील आणि त्यानंतर वित्त व लेखा विभागामार्फत संबंधित शिक्षकांच्या खात्यावर मा.विभागप्रमुख यांनी केलेल्या अंतिम नोंदीनुसार वेतन जमा करण्यात येईल.

६. मा.विभागप्रमुख यांचेकडून 'थकबाकी नसलेले प्रमाणपत्र' (No Dues) प्राप्त झाल्यानंतर अंतिम महिन्याचे वेतन (मे, २०२७) अदा करण्यात येईल.

विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये कार्यरत असलेल्या सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) यांचे दरमहा वेतन वेळेत अदा करण्यासाठी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या हजेरीपत्रकाची विहित वेळेमध्ये नोंदणी करण्यात यावी.

(प्रा.डॉ. प्रफुल्ल पवार)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.एटी/१८६७
दिनांक : २९/१०/२०२६

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी : मा.विभागप्रमुख/मा.संचालक, सर्व शैक्षणिक विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.